माहे नोव्हेंबर-२०२० ते डिसेंबर-२०२० या कालावधीत मुदत संपणाऱ्या ३ नगरपरिषदा व ६५ नगरपंचायतींमधील सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम-२०२०

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**निवडणूक प्राथम्य**

क्रमांक रानिआ/नप-२०२०/प्र.क्र.६/का.०६,
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- १२/१०/२०२०.

प्रति,

जिल्हाधिकारी,
ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, धुळे, अहमदनगर, पुणे, औरंगाबाद, जालना, परभणी, बीड, लातूर, अमरावती, बुलढाणा, यवतमाळ, नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली.

**विषय :- माहे नोव्हेंबर-२०२० ते डिसेंबर-२०२० या कालावधीत मुदत संपणाऱ्या ३ नगरपरिषदा व ६५ नगरपंचायतींमधील सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम-२०२०.**

**संदर्भः-** १) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी सुधारणा अध्यादेश-२०२० दि.२७/०१/२०२०.
२) आयोगाचे क्र.रानिआ/नप-२०२०/प्र.क्र.१/का-६, दि.०६/०२/२०२० चे आदेश.
३) आयोगाचे क्र.रानिआ/नप-२०२०/प्र.क्र.१-अ/का-६, दि.०६/०२/२०२० चे आदेश.
४) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २०२० दि.१२/०३/२०२०.
५) आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक १५/०७/२०२० रोजीचे पत्र.

महोदय/महोदया,

राज्यातील माहे नोव्हेंबर-२०२० ते डिसेंबर-२०२० या कालावधीमध्ये मुदत संपुष्टात येणाऱ्या ३ नगरपरिषदा व ६५ नगरपंचायती सोबतच्या परिशिष्ट-२ मध्ये नमूद नगरपरिषदा/नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका अधिनियमातील तरतुदीनुसार घेणे आवश्यक आहे.

२. महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम ९ (२) मधील तरतुदींनुसार उपरोक्त नगर परिषदा/नगरपंचायतींची सदस्य संख्या संबंधीत विभागीय आयुक्त यांनी शासन राजपत्रात प्रसिध्द केली आहे.

३. आणि ज्याअर्थी, शासनाने दिनांक २७/०१/२०२० महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश-२०२०, प्राख्यापित केला आहे. तसेच शासनाने महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २०२० अन्वये नगरपरिषदांमध्ये बहुसदस्यीय प्रभाग पध्दती ऐवजी एक सदस्यीय प्रभाग पध्दती लागू केली आहे. त्या अनुषंगाने आयोगाने दिनांक ०६/०२/२०२० रोजी नगरपरिषदा/नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता प्रभाग रचना करणे, प्रभागांमध्ये राखीव जागांचे वाटप करणे आणि त्या जागा चक्रानुक्रमे फिरविणे याकरिता सुधारित आदेश निर्गमित केले आहेत. (आदेशाची प्रत सोबत जोडली आहे.)

४. आता या पत्राद्वारे माहे नोव्हेंबर-२०२० ते डिसेंबर-२०२० या कालावधीत मुदती संपणाऱ्या नगर परिषदा/नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम **परिशिष्ट-१** नुसार देण्यात येत आहे. **प्रभाग रचनेसाठी आवश्यक असलेले आदेश/परिपत्रक राज्य निवडणूक आयोगाच्या** https://www.mahasec.maharashtra.gov.in **या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.**

५. प्रभाग रचना अंतिम करण्याबाबतचे यापूर्वीचे संबंधित आदेश अधिक्रमित करुन राज्य निवडणूक आयुक्त यांनी त्यांचे अधिकार रानिआ आदेश क्र.रानिआ/नप-२०२०/प्र.क्र.१-अ/का.६, दि.०६/०२/२०२० अन्वये संबंधित मुख्याधिकारी, जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्त यांना प्रदान केले आहेत.

६. प्रभाग रचनेचे तीन मुख्य टप्पे राहणार आहेत:-

(अ) आरक्षणासह प्रारुप प्रभाग रचना करणे,

(ब) हरकती व सूचनांवरील सुनावणी घेणे व

(क) अंतिम प्रभाग रचना प्रसिध्द करणे.

७. प्रभाग रचना करताना प्रामुख्याने खालील बाबींवर लक्ष देणे आवश्यक आहे. :-

(i) **राज्य निवडणूक आयोगाकडे आपणाकडून प्राप्त झालेल्या माहिती नुसार परिशिष्ट-२** मध्ये नमूद केलेल्या एकूण ६८ नगर परिषदा/नगरपंचायतींची मुदत माहे नोव्हेंबर-२०२० ते डिसेंबर-२०२० या कालावधीमध्ये संपुष्टात येणार आहे. याबाबत आपल्या स्तरावर पुन्हा खात्री करण्यात यावी. त्यामध्ये त्रुटी/तफावत असल्यास ती राज्य निवडणूक आयोगास तात्काळ कळविण्यात यावी.

(ii) या निवडणुकांकरिता जनगणना कार्यालयाची सन २०११ च्या जनगणनेची आकडेवारी वापरण्यात यावी. **तसेच आयोगाच्या दि.०६/०२/२०२० च्या आदेशा सोबतच्या परिशिष्ट-९ मधील नमुन्यानुसार नगर परिषद/नगर पंचायतीचे मुख्याधिकारी यांचेकडून प्रमाणपत्र घेण्यात यावे.**

(iii) प्रभाग रचना करताना गुगल मॅप वापरुन, त्यावर प्रगणक गट दर्शविण्यात यावेत.

(iv) मुख्याधिकारी यांनी अनुसूचित जातीच्या/अनुसूचित जमातीच्या आरक्षणासह प्रारूप प्रभाग रचना प्रस्ताव तयार करावा.

(v) अनुसूचित जाती मधील महिला, अनुसूचित जमातीमधील महिला, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग आणि नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील महिला व सर्वसाधारण महिला याकरिता सोडत, जिल्हाधिकारी यांनी नियुक्त केलेल्या उपजिल्हाधिकारी दर्जापेक्षा कमी नसलेल्या अधिकाऱ्याच्या नियंत्रणाखाली राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या कार्यक्रमानुसार काढावी. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी एकच पद देय असल्यास याबाबत आयोगाच्या प्रभाग रचनेच्या दि.०६/०२/२०२० च्या आदेशातील परिच्छेद क्र. ६ येथील ६.१ (ब) मधील तरतुदींनुसार कार्यवाही करावी.

(vi) सोडतीसाठी, फिरणारा पारदर्शक ड्रम/काचेचा बॉक्स वापरावा व त्यामध्ये टाकावयाच्या चिठ्ठयांचा आकार कमीत कमी A4 या आकाराचा असावा. चिठ्ठीवरील अनुक्रमांक बाहेरुन दिसणार नाहीत याची दक्षता घ्यावी. त्यावर लावावयाचे रबर बँड एकाच रंगाचे असावेत. शक्य असल्यास सोडतीचे थेट प्रक्षेपण स्थानिक केबल टि.व्ही. वर करावे.

(vii) प्रभागरचना आणि **आरक्षण** राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक रानिआ/नप-२०२०/प्र.क्र.१/का.६, दिनांक ०६/०२/२०२० नुसार करावी. या आदेशानुसार विहित केलेल्या परिशिष्ट १ ते ८ नुसारची माहिती तयार करुन ती सर्व जनतेच्या निदर्शनास आणण्याकरिता आवश्यक ती उपाय योजना करावी.

**(viii) सदस्य** पदाच्या आरक्षणाच्या सोडतीकरिता नोटीस, मतदारांच्या माहितीसाठी हरकती व सूचना, अंतिम प्रभाग रचना इत्यादी याकरिता मोठ्या प्रमाणात प्रसिध्दी देण्यात यावी. उदा.

(a) स्थानिक वृत्तपत्रे, केबल टी.व्हि. वर

(b) नगर परिषदा/नगरपंचायतींच्या प्रभाग समितीचे व इतर कार्यालयातील सूचना फलक,

(c) जिल्हाधिकारी व तहसील कार्यालयाचे सूचना फलक

(d) स्थानिक पातळीवर इतर माध्यमे.

(e) जिल्हाधिकारी व नगर परिषद/नगर पंचायतीच्या संकेत स्थळावर इत्यादी

(ix) प्रारूप प्रभाग रचना व अंतिम प्रभाग रचना जिल्हाधिकारी व नगर परिषद/नगर पंचायतीच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करणे बंधनकारक राहील.

(x) सोडतीच्यावेळी प्रारुप प्रभाग रचनेचा नकाशा व त्याच्या चतुःसिमा, सोडतीसाठी येणाऱ्या नागरिकांना सहज दिसेल अशा ठिकाणी लावून ठेवावा.

(xi) सोडत, जिल्हाधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या उपजिल्हाधिकारी दर्जापेक्षा कमी नसलेल्या अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली होईल. प्रभाग रचना, आरक्षण व सोडत इत्यादी पासून अंतिम अधिसूचना प्रसिध्द करण्यापर्यंतच्या कार्यवाहीवर नियंत्रण ठेवण्याकरीता उपजिल्हाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करावी. सोडतीची रंगीत तालीम फक्त संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांचे उपस्थितीत घ्यावी.

८. राज्यामध्ये कोरोना विषाणूची (कोव्हीड-१९) महामारी सुरु असल्याने केंद्र व राज्य शासनाने ठरवून दिलेल्या निकषांचे तंतोतंत पालन करुन नमूद नगर परिषदा/नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी **प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम-२०२०** राबवतेवेळी आवश्यक त्या उपाय योजना राबविण्यात याव्यात.

९. राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयातील दूरध्वनी क्रमांक तसेच ई-मेल पुढीलप्रमाणे आहे:-

दूनध्वनी क्रमांक :- २२०४५०७५ / २२०२७७३७ / २२८४६७२०

ई-मेल :- sec.mh@gov.in

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

12/10/2020

( संजय सावंत )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

सहपत्र- परिशिष्ट-१ व २

प्रत:-

१. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
३. सर्व विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन
४. संबंधित नगर परिषदा/नगरपंचायतींचे मुख्याधिकारी
५. राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी व कार्यासने
६. राज्य निवडणूक आयोगाचे मुंबई उच्च न्यायालयाच्या तिन्ही खंडपीठांमध्ये नेमलेले वकील
७. निवड नस्ती/कार्या.६

# प्रभाग रचना, आरक्षण व सोडत कार्यक्रम

## परिशिष्ट -१

**माहे नोव्हेंबर-२०२० ते डिसेंबर-२०२० या कालावधीत मुदत संपणाऱ्या ३ नगरपरिषदा व ६५ नगरपंचायतींसाठी प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम -२०२०.**

**(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/नप-२०२०/प्र.क्र.६/का-०६, दि. १२/१०/२०२० सोबतचे परिशिष्ट.)**

| अ. क्र. | टप्पा | कार्यवाही कोणी करावयाची आहे. | टप्पा सुरु करण्याचा / संपविण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | **अ) प्रारुप प्रभाग रचना आरक्षणासह** | | |
| १. | प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव (नगर परिषदा/नगर पंचायतीच्या प्रभागांची संख्या, त्यांची प्रभागनिहाय एकूण व अनुसूचित जाती तसेच अनुसूचित जमातीची २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या, क्षेत्र, सीमांकन, नकाशा, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आरक्षण यासह) जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करणे | मुख्याधिकारी | २१/१०/२०२० (बुधवार) (पर्यंत) |
| २. | प्रारुप प्रभाग रचनेच्या प्रस्तावास मान्यता देणे. | जिल्हाधिकारी | २९/१०/२०२० (गुरुवार) (पर्यंत) |
| ३. | सदस्य पदांच्या आरक्षणाच्या सोडतीकरिता नोटीस प्रसिध्द करणे (जिल्हाधिकारी व नगर परिषद/नगरपंचायतीच्या वेबसाईटसह) | जिल्हाधिकारी | ०३/११/२०२० (मंगळवार) |
| ४. | नगर परिषदा/नगरपंचायतींच्या सदस्य पदांच्या आरक्षणाची सोडत काढणे. (अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीमधील महिला, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व त्यामधील महिला तसेच सर्वसाधारण प्रवर्गातील महिला) | मुख्याधिकारी | १०/११/२०२० (मंगळवार) |
| | **ब) हरकती व सूचना तसेच सुनावणी** | | |
| १. | प्रारुप प्रभाग रचना, प्रभागदर्शक नकाशे व सदस्य पदांच्या आरक्षणाची (अधिसूचना कलम १० नुसार) रहिवाश्यांच्या माहितीसाठी व हरकती तसेच सूचना मागविणेकरिता वृत्तपत्रात व स्थानिकपातळीवर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व नगर परिषद/नगरपंचायतीच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणे | जिल्हाधिकारी | १८/११/२०२० (बुधवार) पर्यंत |
| २. | हरकती व सूचना मागविण्याचा कालावधी | | १८/११/२०२० (बुधवार) ते २६/११/२०२० (गुरुवार) पर्यंत |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | प्राप्त हरकती व सूचनांवर सुनावणी देणे. | जिल्हाधिकारी | ०४/१२/२०२० (शुक्रवार) पर्यंत |
| ४. | हरकती व सूचनांच्या अनुषंगाने अभिप्राय देऊन **संबंधित विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन,** यांचेकडे अहवाल पाठविणे | जिल्हाधिकारी | १०/१२/२०२० (गुरुवार) पर्यंत |
| ५. | अंतिम प्रभाग रचनेस मान्यता देणे. | **संबंधित विभागीय आयुक्त** | १७/१२/२०२० (गुरुवार) पर्यंत |
| **क) अंतिम प्रभाग रचना (प्रभाग निहाय एकूण लोकसंख्या, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीची लोकसंख्या तसेच आरक्षणासह)** | | | |
| १. | अधिनियमातील कलम १० नुसार अंतिम अधिसूचना वृत्तपत्रात व स्थानिकपातळीवर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व नगर परिषद/नगरपंचायतीच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणे. | जिल्हाधिकारी | २४/१२/२०२० (गुरुवार) पर्यंत |

**टीपः- प्रत्येक नगर परिषद/नगर पंचायतीची प्रभाग रचना, आरक्षण व सोडत इत्यादी ते अंतिम अधिसूचना प्रसिध्द करण्यापर्यंतच्या कामावर नियंत्रण ठेवण्याकरीता जिल्हाधिकारी यांनी उप जिल्हाधिकारीपेक्षा कमी नसलेल्या दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करावी.**

(संजय सावंत) १२/१०/2020
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

# नगर परिषदा / नगरपंचायतींची नावे

## परिशिष्ट -२ (सार्वत्रिक निवडणुकांसाठी)

(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/नप-२०२०/प्र.क्र.६/का-६, दि. १२/१०/२०२० सोबतचे सहपत्र)

| SR. NO. | DISTRICT | NAME OF THE MUNICIPAL COUNCIL AND NAGAR PANCHAYAT | MC/NP | DATE OF ELECTION | DATE OF FIRST MEETING | DATE OF EXPIRY |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | THANE | MURBAD | NP | 01-11-2015 | 30-11-2015 | 29-11-2020 |
| 2 | THANE | SHAHAPUR | NP | 01-11-2015 | 30-11-2015 | 29-11-2020 |
| 3 | RATNAGIRI | MANDANGAD | NP | 01-11-2015 | 27-11-2015 | 26-11-2020 |
| 4 | SINDHUDURG | KASAI - DODAMARG | NP | 01-11-2015 | 24-11-2015 | 23-11-2020 |
| 5 | SINDHUDURG | VABHAVE - VAIBHAVWADI | NP | 01-11-2015 | 24-11-2015 | 23-11-2020 |
| 6 | NASHIK | **CHANDWAD** | **MC** | 01-11-2015 | 30-11-2015 | 29-11-2020 |
| 7 | NASHIK | NIPHAD | NP | 01-11-2015 | 30-11-2015 | 29-11-2020 |
| 8 | NASHIK | PEINT | NP | 01-11-2015 | 30-11-2015 | 29-11-2020 |
| 9 | NASHIK | DEOLA | NP | 01-11-2015 | 30-11-2015 | 29-11-2020 |
| 10 | NASHIK | KALWAN | NP | 01-11-2015 | 30-11-2015 | 29-11-2020 |
| 11 | NASHIK | SURGANA | NP | 01-11-2015 | 30-11-2015 | 29-11-2020 |
| 12 | DHULE | SAKRI | NP | 01-11-2015 | 27-11-2015 | 26-11-2020 |
| 13 | AHMEDNAGAR | AKOLE | NP | 01-11-2015 | 26-11-2015 | 25-11-2020 |
| 14 | AHMEDNAGAR | KARJAT | NP | 01-11-2015 | 26-11-2015 | 25-11-2020 |
| 15 | AHMEDNAGAR | PARNER | NP | 01-11-2015 | 26-11-2015 | 25-11-2020 |
| 16 | PUNE | **CHAKAN** | **MC** | 01-11-2015 | 24-11-2015 | 23-11-2020 |
| 17 | AURANGABAD | SOYGAON | NP | 01-11-2015 | 27-11-2015 | 26-11-2020 |
| 18 | JALNA | BADNAPUR | NP | 01-11-2015 | 15-12-2015 | 14-12-2020 |
| 19 | JALNA | GHANSAWANGI | NP | 01-11-2015 | 15-12-2015 | 14-12-2020 |
| 20 | JALNA | JAFRABAD | NP | 01-11-2015 | 15-12-2015 | 14-12-2020 |
| 21 | JALNA | MANTHA | NP | 01-11-2015 | 15-12-2015 | 14-12-2020 |
| 22 | PARBHANI | PALAM | NP | 01-11-2015 | 27-11-2015 | 26-11-2020 |
| 23 | BEED | SHIRUR (KASAR) | NP | 01-11-2015 | 27-11-2015 | 26-11-2020 |
| 24 | BEED | WADVANI | NP | 01-11-2015 | 27-11-2015 | 26-11-2020 |
| 25 | BEED | PATODA | NP | 01-11-2015 | 27-11-2015 | 26-11-2020 |
| 26 | BEED | AASHTI | NP | 01-11-2015 | 27-11-2015 | 26-11-2020 |
| 27 | LATUR | JALKOT | NP | 01-11-2015 | 27-11-2015 | 26-11-2020 |
| 28 | LATUR | CHAKUR | NP | 01-11-2015 | 27-11-2015 | 26-11-2020 |
| 29 | LATUR | DEVNI | NP | 01-11-2015 | 27-11-2015 | 26-11-2020 |
| 30 | LATUR | SHIRUR-ANANTPAL | NP | 01-11-2015 | 27-11-2015 | 26-11-2020 |
| 31 | AMRAVATI | BHATKULI | NP | 01-11-2015 | 30-11-2015 | 29-11-2020 |
| 32 | AMRAVATI | TIOSA | NP | 01-11-2015 | 30-11-2015 | 29-11-2020 |
| 33 | AMRAVATI | DHARNI | NP | 01-11-2015 | 30-11-2015 | 29-11-2020 |
| 34 | AMRAVATI | NAND. KHANDESHWAR | NP | 01-11-2015 | 30-11-2015 | 29-11-2020 |

| SR. NO. | DISTRICT | NAME OF THE MUNICIPAL COUNCIL AND NAGAR PANCHAYAT | MC/NP | DATE OF ELECTION | DATE OF FIRST MEETING | DATE OF EXPIRY |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 35 | BULDHANA | SANGRAMPUR | NP | 01-11-2015 | 26-11-2015 | 25-11-2020 |
| 36 | BULDHANA | MOTALA | NP | 01-11-2015 | 26-11-2015 | 25-11-2020 |
| 37 | YAVATMAL | MAHAGAON | NP | 01-11-2015 | 27-11-2015 | 26-11-2020 |
| 38 | YAVATMAL | KALAMB | NP | 01-11-2015 | 27-11-2015 | 26-11-2020 |
| 39 | YAVATMAL | ZARI-JAMANI | NP | 01-11-2015 | 27-11-2015 | 26-11-2020 |
| 40 | YAVATMAL | BABHULGAON | NP | 01-11-2015 | 27-11-2015 | 26-11-2020 |
| 41 | YAVATMAL | RALEGAON | NP | 01-11-2015 | 27-11-2015 | 26-11-2020 |
| 42 | YAVATMAL | MAREGAON | NP | 01-11-2015 | 27-11-2015 | 26-11-2020 |
| 43 | NAGPUR | HINGNA | NP | 01-11-2015 | 27-11-2015 | 26-11-2020 |
| 44 | NAGPUR | KUHI | NP | 01-11-2015 | 27-11-2015 | 26-11-2020 |
| 45 | NAGPUR | BHIWAPUR | NP | 01-11-2015 | 27-11-2015 | 26-11-2020 |
| 46 | WARDHA | KARANJA | NP | 01-11-2015 | 30-11-2015 | 29-11-2020 |
| 47 | WARDHA | ASHTI | NP | 01-11-2015 | 30-11-2015 | 29-11-2020 |
| 48 | WARDHA | SELOO | NP | 01-11-2015 | 30-11-2015 | 29-11-2020 |
| 49 | WARDHA | SAMUDRAPUR | NP | 01-11-2015 | 30-11-2015 | 29-11-2020 |
| 50 | BHANDARA | MOHADI | NP | 01-11-2015 | 30-11-2015 | 29-11-2020 |
| 51 | BHANDARA | LAKHANI | NP | 01-11-2015 | 30-11-2015 | 29-11-2020 |
| 52 | BHANDARA | LAKHANDUR | NP | 01-11-2015 | 30-11-2015 | 29-11-2020 |
| 53 | GONDIA | SADAKARJUNI | NP | 01-11-2015 | 27-11-2015 | 26-11-2020 |
| 54 | GONDIA | ARJUNI | NP | 01-11-2015 | 27-11-2015 | 26-11-2020 |
| 55 | GONDIA | GOREGAON | NP | 01-11-2015 | 27-11-2015 | 26-11-2020 |
| 56 | GONDIA | DEORI | NP | 01-11-2015 | 27-11-2015 | 26-11-2020 |
| 57 | CHANDRAPUR | **CHIMOOR** | **MC** | 01-11-2015 | 30-11-2015 | 29-11-2020 |
| 58 | CHANDRAPUR | SAWLI | NP | 01-11-2015 | 30-11-2015 | 29-11-2020 |
| 59 | CHANDRAPUR | POMBHURNA | NP | 01-11-2015 | 30-11-2015 | 29-11-2020 |
| 60 | GADCHIROLI | MULCHERA | NP | 01-11-2015 | 26-11-2015 | 25-11-2020 |
| 61 | GADCHIROLI | BHAMRAGAD | NP | 01-11-2015 | 30-11-2015 | 29-11-2020 |
| 62 | GADCHIROLI | SIRONCHA | NP | 01-11-2015 | 30-11-2015 | 29-11-2020 |
| 63 | GADCHIROLI | ETAPALLI | NP | 01-11-2015 | 26-11-2015 | 25-11-2020 |
| 64 | GADCHIROLI | CHAMORSHI | NP | 01-11-2015 | 30-11-2015 | 29-11-2020 |
| 65 | GADCHIROLI | KORCHI | NP | 01-11-2015 | 26-11-2015 | 25-11-2020 |
| 66 | GADCHIROLI | DHANORA | NP | 01-11-2015 | 30-11-2015 | 29-11-2020 |
| 67 | GADCHIROLI | KURKHEDA | NP | 01-11-2015 | 30-11-2015 | 29-11-2020 |
| 68 | GADCHIROLI | AHERI | NP | 01-11-2015 | 26-11-2015 | 25-11-2020 |